महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org


जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२१/ 3699 दिनांक : 15 DEC 2021

**अत्यंत महत्वाचे/अतितात्काळ/ई-मेलद्वारे**

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित,
पदविका अभियांत्रिकी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
औरंगाबाद विभाग.

विषय - AISHE-2020-21 कार्यक्रमांतर्गत माहिती अपलोड करण्याबाबत...

संदर्भ : - मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.३/तंशिसं/आयटीसेल/ एआयएसएचई/२०२१-२२/६८, दि.०२/१२/२०२१.

या विभागीय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या सर्व पदविका संस्थांना सुचित करण्यात येते की, या विभागीय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या ज्या नवीन/जुन्या पदविका संस्थांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमाच्या वेबपोर्टलवर नोंदणी (रजिस्ट्रेशन) केलेली नाही अशा सर्व पदविका संस्थांनी सन २०२०-२१ करिता अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) यावेबपोर्टलवर त्वरीत रजिस्ट्रेशन/नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ करीता रजिस्ट्रेशन/ नोंदणीकरिता AISHE वेबपोटलवर दि. ०१-१२-२०२१ पासून सुरु झाले आहे. तरी सर्व संस्थांनी नोंदणी व सीएफ-३ दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ पर्यंत अपलोड करावयाचे आहे.

संबंधीत संस्थानी www.aishe.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करण्या संबंधी कार्यवाही पूर्ण करावी, ज्या संस्थांना याबाबत अडचणी येतील त्यांनी सांख्यिकी शाखा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे प्रत्यक्ष भेट देवून किंवा दूरध्वनीवर संपर्क दूरध्वनी क्र (०२०-६५००११७३/६५००१०१६ ) साधून अडचणीचे निराकरण करून घ्यावे.

AISHE ची माहिती www.aishe.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी न केल्यामुळे संस्था किंवा विद्यार्थी यांना शासकीय योजने पासून वंचित रहावे लागल्यास त्यासाठी सर्वस्वी संस्थेस जबाबदार धरण्यात येईल, याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत: १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.